आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

११ मार्च २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नोंदणी केल्यावर अडीच दिवसात सिलिंडर घरपोच दिलं जात असल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाचं स्पष्टीकरण

- चार दशकांनंतर लोकसभेच्या सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला जाणं खेदजनक असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यासमोर अडचणी असल्या तरी त्यातून मार्ग काढण्याची क्षमता राज्यात असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत प्रतिपादन

- इराणकडून व्यावसायिक जहाजं आणि दुबई विमानतळावर हल्ले

**आणि**

- नेपाळमध्ये मतमोजणी पूर्ण, राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाला सर्वाधिक ५१ लाखांहून अधिक मतं

**<><><><><>**

घरगुती वापराच्या सिलिंडरची नोंदणी केल्यानंतर सरासरी अडीच दिवसांत पुरवठा सुरू आहे. त्यामुळं नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथे पश्चिम आशियातल्या सद्यस्थितीबद्दल त्या आज संबोधित करत होत्या. सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे एलपीजीच्या उत्पादनात २५ टक्के वाढ झाली आहे, असं त्या म्हणाल्या.

तसंच, या काळात सिलिंडरची साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशाराही शर्मा यांनी दिला. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येणाऱ्या कच्च्या तेलाच्या आयातीपेक्षा भारतात इतर देशांमधून कच्च्या तेलाची आयात जास्त आहे. आज भारत ४० देशांमधून कच्च्या तेलाची आयात करतो

आणि तेल विपणन कंपन्यांनी ही आयात सुनिश्चित केल्याचं त्या म्हणाल्या. देशातल्या गॅस कंपन्यांनी नवीन स्रोतांकडून कच्च्या तेलाचे कार्गो खरेदी केले आहेत, अशी माहितीही शर्मा यांनी दिली.

सध्या पर्शियन आखातात २८ भारतीय जहाजं असून त्यावर ७७८ भारतीय कार्यरत आहेत. सरकार या सर्व जहाजांच्या सुरक्षिततेसाठी समन्वय साधत आहे. या जहाजांवर वैद्यकीय मदत आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यात येत आहे, अशी माहिती बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी दिली.

**<><><><><>**

सुमारे चार दशकांनंतर लोकसभेच्या सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला गेला आहे. सभागृह आणि संसदीय राजकारण, या दोन्हीसाठी ही अत्यंत खेदजनक बाब असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज लोकसभेत म्हणाले. सभापतींवरच्या अविश्वास प्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान ते बोलत होते. सभापतींच्या प्रामाणिकपणाबाबत शंका घेण्याचा हा प्रकार दुर्दैवी आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितलं.

**होल्ड अमित शहा**

विरोधी पक्षातल्या काही नेत्यांचा अहंकार उफाळून आल्यानं हा प्रस्ताव आणला गेला, असा आरोप भाजपाचे रवी शंकर प्रसाद म्हणाले. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल  गांधी यांनी परदेशी गेल्यावर जपून बोलावं, असा सल्ला त्यांनी दिला.   लोकसभेच्या सभापतींनी विरोधी पक्षनेत्याला बोलायची संधीच न देणं, विरोधकांना मुद्दे मांडण्यासाठी वेळ न देणं हे भारतीय लोकशाहीच्या इतिहासात प्रथमच घडत असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज तामीळनाडूत सुमारे ५ हजार ६५० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन, लोकार्पण, आणि पायाभरणी केली. या प्रकल्पांमधून तामीळनाडूतल्या युवकांसाठी हजारो रोजगार निर्माण होतील, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

नीती आयोगानं आज प्रसिद्ध केलेल्या आर्थिक वर्ष २०२३-२४च्या वित्तीय आरोग्य निर्देशांकात महाराष्ट्र ४५ गुणांसह देशात पाचव्या स्थानी आहे. ओडिशा पहिल्या, गोवा दुसऱ्या, झारखंड तिसऱ्या, तर गुजरात चौथ्या स्थानावर आहे. देशातल्या विविध राज्यांच्या आर्थिक कामगिरीचं मूल्यमापन आणि तुलनात्मक विश्लेषण या अहवालात केलं जातं. त्यानुसार, आर्थिक व्यवस्थेत किरकोळ बदल करून महाराष्ट्रासह इतर काही राज्यांनी परिस्थिती स्थिर राखल्याचं अहवालात म्हटलं आहे. कर्जाची पातळी कमी ठेवून व्याजाचा बोजा नियंत्रणात ठेवल्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था स्थिर राहिली, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यासमोर अडचणी नाहीत असं नाही, मात्र अडचणीतून मार्ग काढण्याची क्षमता महाराष्ट्रात असून आर्थिक शिस्तीचं पालन करत यंदाचा अर्थसंकल्प मांडला आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. ते अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होते. राज्यावरचं कर्ज वाढलं हे खरं आहे मात्र स्थूल राज्यांतर्गत उत्पादनाच्या २५ टक्क्यांच्या आत कर्ज असणं आवश्यक असतं, आणि महाराष्ट्रावरचं कर्ज १८ टक्के आहे. त्यामुळे अजून कर्ज घेण्याची महाराष्ट्राची क्षमता आहे असं ते म्हणाले.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही जगातली तिसाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. राज्य दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत देशात पाचव्या क्रमांकावर आहे, मात्र राज्याच्या जीडीपी वाढीचा दर देशाच्या जीडीपी वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे, असं ते म्हणाले. भांडवली खर्च २ लाख कोटींपर्यंत पोहोचला आहे, ज्या तुलनेनं कर्ज वाढलंय त्याच्या कितीतरी पट अधिक भांडवली गुंतवणूक वाढली आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. सिंचन, ऊर्जा, सामाजिक न्याय अशा सर्व विभागांत प्रगती झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

इराणने बुधवारी पर्शियन आखातातल्या व्यावसायिक जहाजांवर तसंच दुबई विमानतळावर हल्ला केला. विमानतळावर झालेल्या ड्रोन हल्ल्यात चार जण जखमी झाले असून विमान उड्डाणांवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. यानंतर मध्य पूर्वेतील बँका आणि वित्तीय संस्थांना लक्ष्य केल जाईल, असा इशारा इराणने दिला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या थायलंडच्या मालवाहू जहाजावरही हल्ला झाला असून ओमानच्या नौदलाने २० जणांना वाचवलं आहे. कुवैतवरही इराणने ड्रोन हल्ला केला असून त्यातले आठ ड्रोन कुवैतच्या संरक्षण दलाने नष्ट केले आहेत.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांच्याशी चर्चा केली आणि पश्चिम आशियातल्या युद्धाविषयी चर्चा केली. तसंच, फ्रान्सचे परराष्ट्र मंत्री जीन नोएल बॅरोट यांच्याशीही पश्चिम आशियातल्या संघर्षाबाबत चर्चा केल्याचं जयशंकर यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रिलायन्स उद्योग समूहासोबत सुमारे ३०० अब्ज अमेरिकन डॉलरची भागीदारी जाहीर केली आहे. या भागीदारीतून अमेरिकेतला पहिला तेलशुद्धीकरण कारखाना सुरु केला जाणार आहे. अमेरिकन ऊर्जा क्षेत्रातला हा ऐतिहासिक निर्णय असल्याचं ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारातली कालची तेजी औट घटकेची असल्याचं आज स्पष्ट झालं. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये सकाळपासून सुरू झालेली घसरण दिवस अखेरपर्यंत वाढत गेली. बाजार बंद होताना सेन्सेक्स १ हजार ३४२ अंकांची घसरण नोंदवून ७६ हजार ८६४ अंकांवर बंद झाला. निफ्टीमध्ये ३९५ अंकांची घट झाली आणि हा निर्देशांक २३ हजार ८६७ अंकांवर स्थिरावला. कच्च्या तेलाच्या पुरवठ्यातले अडथळे, वाढणारी महागाई, अर्थव्यवस्थेवर होणारे दुष्परिणाम यासारख्या कारणांनी ही घसरण दिसून आल्याचं विश्लेषकांनी सांगितलं.

<><><><><>

नेपाळमध्ये प्रतिनिधी मंडळासाठी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाला सर्वाधिक ५१ लाखांहून अधिक मत मिळाली आहेत. नेपाळी काँग्रेसला सुमारे साडे १७ लाख, कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (UML) ला १४ लाखांहून अधिक आणि नेपाळी कम्युनिस्ट पक्षाला ८ लाखांहून अधिक मतं मिळाली. एकूण १ कोटी ७० लाख ३९ हजार जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. या मतांच्या आधारे नेपाळचा निवडणूक आयोग तिथल्या राजकीय पक्षांना जागांचं वाटप करणार आहे.

//<><><><><>//